1 9 FEB 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवजयंतीच्या पूर्वप्रभातीला दि. १८ फेब्रुवारी रोजी उगवतीच्या सूर्याने अवघ्या काही क्षणांसाठी आसमंत असा भगव्या-नारंगी रंगात न्हाऊन काढला. या लालिमेच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा. (छाया : डॉ. आलोक जत्राटकर)

# शिवजन्मोत्सवासाठी कोल्हापूरनगरी सज्ज

**कोल्हापूर :** त्याग, निष्ठा, पराक्रम आणि स्वाभिमानाचा दिवस असलेली शिवजयंती गुरुवारी जिल्ह्यात उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. यासाठी शहर परिसरातील तालीम संस्था, शिवप्रेमी मंडळे, संस्था संघटनांनी जय्यत तयारी केली आहे. सकाळी १०.१० वाजता पाळणा सोहळा, सायंकाळी भव्य मिरवणुकांचेही आयोजन केले आहे.

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती गुरुवारी शहरासह जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. यासाठी शहरातील प्रमुख तालीम-मंडळांकडून जय्यत तयारीही करण्यात आली आहे. शहरातील शिवाजी पेठ, मंगळवार पेठ परिसरात तर गेल्या आठ दिवसांपासून विविध सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन स्थानिकांकडून करण्यात आले आहे, तर शिवजयंतीच्या आदल्या दिवशी बुधवारी रात्री असंख्य शिवप्रेमी युवक शिवज्योत आणण्यासाठी किल्ले पन्हाळगड येथे पोहोचले होते. गुरुवारी सकाळी छत्रपती शिवाजी चौक येथे ही ज्योत आणून शिवरायांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. सकाळी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शिवाजी चौकातच शिवजन्म सोहळा संपन्न होणार आहे, तर ठिकठिकाणी शिवमूर्ती पूजन, प्रतिमापूजन करण्यात येणार आहे. सायंकाळी शिवाजी पेठेतील शिवाजी तरुण मंडळातर्फे भव्य मिरवणूक, तर मिरजकर तिकटी येथील मावळा ग्रुपतर्फे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 FEB 2026 पुण्यनगरी

# पर्यावरण जीवनवादाशी जोडल्यास मानवी जीवन सुसह्य

## अतुल देऊळगावकर: 'साहित्य, संस्कृती, विज्ञान, माध्यमे आणि शाश्वत विकास'वर विशेष व्याख्यान



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशातील सध्याच्या विकास सर्वभक्षी बाजार संस्कृतीचे लक्षण असल्याने विकासाच्या संकल्पनांची पुनर्मांडणी होणे आवश्यक आहे. यासाठी पर्यावरणाचा प्रश्न जीवनवादाशी जोडला गेला तरच मानवी जीवन सुसह्य होईल, असे मत पर्यावरणतज्ज्ञ अतुल देऊळगावकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचा पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, हिंदी अधिविभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन आणि लक्ष्मी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'साहित्य, संस्कृती, विज्ञान, माध्यमे आणि शाश्वत विकास' या विषयावरील विशेष व्याखानाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. विलास शिंदे म्हणाले, निसर्ग संवर्धनासाठी केवळ झाडे लावणे पुरेसे नाही, तर त्यामागचे विज्ञान समजून घेणे आवश्यक आहे.

प्रास्ताविक पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, पाहुण्यांची ओळख प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी करून दिली, तर आभार शरद आजगेकर यांनी मानले. यावेळी लक्ष्मी फाऊंडेशनचे विनायक देसाई, ज्येष्ठ आर्किटेक्ट शिरीष बेरी, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर आदी उपस्थित होते.

19 FEB 2026
पुण्यनगरी

# लिंगभाव समानतेवर आधारित प्राथमिक प्रशिक्षण

**कोल्हापूर :** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अंतर्गत माविममार्फत राबविण्यात येत असलेल्या नवतेजस्विनी- महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत माविम मित्र मंडळ यांच्याकरिता दिनांक १७ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत हॉटेल कोहिनूर येथे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाकरिता जिल्ह्यातील ४० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. प्रशिक्षणाचे उद्घाटन डॉ. उत्तम सकट, उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, शिरीष काटकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, कुंदन शिनगारे, वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी माविम यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाला. प्रशिक्षणमध्ये हवामान, हवामान बदल, हवामान बदलामुळे होणारे परिणाम आणि असुरक्षितता, वातावरण या विषयाबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच हरितगृह प्रभाव व जागतिक तापमान वाढ आणि लिंगाधारित हवामानाचा होणारा परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामाला कमी करण्यासाठी परिस्थितीला जुळवून घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले, तसेच बदलत्या हवामानाला जुळवून घेण्याकरिता स्मार्ट याबाबतचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

19 FEB 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माजी विद्यार्थ्यांनी संस्थेशी असलेले संबंध दृढ करावेत : पांडव

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

माजी विद्यार्थ्यांनी संस्थेशी असलेले संबंध दृढ करावेत, जेणेकरून आजी विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा होऊन चांगले करिअर घडू शकते. माजी विद्यार्थ्यांनाही त्यांच्या कौशल्य विकासामध्ये महाविद्यालयाची मदत होऊ शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील संलग्नता विभागाचे उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी केले.

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील अॅड. श्रीपतराव शिंदे एज्युकेशनल कॅम्पसमधील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि राधाबाई शिंदे कॉलेज ऑफ फार्मसीच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास २०११ ते २०२४-२५ पर्यंतचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.




**भडगाव : डॉ. पी. एस. पांडव यांचे स्वागत करताना महेश कोरी. उपस्थित प्राचार्य एस. एम. कुरबेट्टी यांच्यासह अन्य.**

पांडव पुढे म्हणाले, माजी विद्यार्थ्यांनी आजी विद्यार्थी व कॉलेज यांच्या समन्वयातून कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा विकास करावा. असे मेळावे शहरात आयोजित करून तेथील माजी विद्यार्थ्यांचा कॉलेजच्या विकासासाठी उपयोग करून घ्यावा.

महेश कोरी यांनी माजी विद्यार्थ्यांना संस्थेच्या प्रगतीसाठी सक्रिय सहभाग नोंदवा, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी, माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन कॉलेजच्या विकासासाठी सदैव तत्पर राहावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा उर्मिलादेवी शिंदे, सचिव स्वाती कोरी यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रतीक कोरी, प्राचार्य डॉ. एस. एम. इंगळे, प्राचार्य डॉ. एस एम. कुरबेट्टी, प्रा. किशोर जोशी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. श्रीपाद बागडी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रोहित सव्यानावर यांनी आभार मानले.

19 FEB 2026

सकाळ

# लोकसंख्येच्या प्रमाणात महिलांसाठी तरतूद हवी

## प्रा. डॉ. विजय ककडे; विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राची कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १८ : 'महिलांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात दहा टक्के तरतूद केली आहे. महिलांची लोकसंख्या ४९ टक्के आहे. त्या प्रमाणात वाटा असावा', असे मत प्रा. डॉ. विजय ककडे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रातर्फे आयोजित 'महिला : केंद्रीय अर्थसंकल्प २०२६' कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी 'दिलासा' महिला संस्थेच्या अध्यक्ष डॉ. रूपा शहा होत्या. 'जेंडर बजेट' संकल्पनेला वीस वर्षे पूर्ण झाली असून, अर्थसंकल्पात 'जेंडर बजेट स्टेटमेंट' दिले जाते, असे मत प्रा. ककडे यांनी व्यक्त केले. स्वयंसेवी महिला उद्योजकांना अंदाजपत्रकात महत्त्व दिले आहे. महिला उद्योजकांसाठी रिटेल आऊटलेट आणि शासकीय वसतिगृह आणि होस्टेलची तरतूद आहे, असे वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे डॉ. केदार मारुलकर यांनी सांगितले.' अर्थसंकल्पात महिलांसाठी याआधीच्या तरतुदीच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन झाले, तरच 'बजेटचा' उदेश साध्य होण्यास मदत होईल, असे मत डॉ. रूपा शहा यांनी व्यक्त केले. स्त्री अभ्यास केंद्रसंचालक प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविकात 'जेंडर बजेट' संकल्पना महत्त्वाची असून, सर्व स्तरावर दृष्टिकोन तयार व्हावा, असे सांगितले. डॉ. राजेंद्र पारिजात आणि प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी स्वागत केले. इतिहास, इंग्रजी, अर्थशास्त्र, पत्रकारिता आणि स्त्री अभ्यास केंद्राचे विद्यार्थी उपस्थित होते. यश हेगडे-पाटील यांनी आभार मानले.



कोल्हापूर : 'महिला : केंद्रीय अर्थसंकल्प २०२६' कार्यशाळेत बोलताना प्रा. डॉ. विजय ककडे.

19 FEB 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इथे दररोज होतो शिवरायांचा जयघोष!

कोल्हापूर : प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने कोल्हापुरात दि. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले. तेव्हापासून आजतागायत या सागरमाळ परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांना नित्यनेमाने अभिवादन करून त्यांच्या नावाचा मनोभावे जयघोष केला जातो. शिवाजी विद्यापीठात शिवजयंतीचे वातावरण अधिकच भारावून टाकणारे असते.

छत्रपती राजाराम महाराज, प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्या प्रेरणेतून आणि स्व. यशवंतराव चव्हाण, लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रयत्नांतून कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्नुषा महाराणी ताराबाई यांनी स्थापन



केलेल्या आणि

राजर्षी शाहू महाराज यांच्या पुरोगामी द्रष्ट्या नेतृत्वामुळे आधुनिकतेची दिशा लाभलेल्या करवीरनगरीत शिवरायांच्या नावाने विद्यापीठ स्थापन होण्याला वेगळे संदर्भ होते. प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकार स्व. बी. आर. खेडकर यांनी तयार केलेला महाराजांचा (चौथऱ्यासह) ३६ फूट ६ इंच उंचीचा आणि आठ टनांचा संपूर्ण ब्राँझमधील पुतळा या विद्यापीठाच्या प्रांगणात दि. १ डिसेंबर १९७४ रोजी बसवला. छत्रपती शिवाजी महाराजांचे जगातील सर्वाधिक देखणे असे हे शिल्प आहे. विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्यांचे हे शिल्प प्रेरणास्रोत ठरले आहे.

## पुतळ्याची मनोभावे स्वच्छता करणारे जनार्दन गवळी

विद्यापीठाचे कुलगुरूपद स्वीकारण्यास येत असताना प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी आपल्यासोबत मनोहर पाटील नावाचा एक तरुण शिपाई म्हणून आणला होता. महागावकर बंगल्यात विद्यापीठ कार्यालय असतेवेळी तेथील एका मारुती मंदिरात तो न चुकता पूजाअर्चा करत. त्यांनाच पुढे शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची स्वच्छता करण्याचे काम दिले होते. ते नोकरीत पुढे हवालदार झाले; पण सेवानिवृत्त होईपर्यंत रोज आंघोळ झाल्याबरोबर न चुकता पुतळा धुणे, अष्टगंध, फुले वाहून महाराजांची पूजा करून त्यांना वंदन करूनच त्यांची पुढील दिनचर्या सुरू व्हायची. हे सर्व विनामोबदला, स्वखुशीने व कोणीही त्यांना न सांगता किंवा कोणाच्या आदेशाशिवाय ते करीत असत. त्यांचा हा वारसा पुढे जनार्दन गवळी यांनी आजतागायत सांभाळला आहे. दहा वर्षे रोजंदारी म्हणून आणि त्यानंतर २२ वर्षे सहा महिने नोकरीत असताना आणि मे २०१७ मध्ये निवृत्त झाल्यानंतरही आजपर्यंत हे काम गवळी निष्ठेने व श्रद्धेने करत आहेत.

19 FEB 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इथे रोज होतो छत्रपती शिवरायांचा जयघोष!

## शिवाजी विद्यापीठातील प्रेरणास्रोत; सर्वाधिक छायाचित्रे काढले जाणारे ठिकाण

कोल्हापूर, ता. १८ : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने येथे १८ नोव्हेंबर १९६२ ला शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले. तेव्हापासून आजतागायत या सागरमाळ परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांना नित्यनेमाने अभिवादन करून त्यांच्या नावाचा मनोभावे जयघोष केला जातो.

छत्रपती राजाराम महाराज, प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्या प्रेरणेतून आणि दिवंगत माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रयत्नांतून कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले. शिवाजी महाराज यांच्या स्नुषा महाराणी ताराबाई यांनी स्थापन केलेल्या आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या पुरोगामीद्रष्ट्या नेतृत्वामुळे आधुनिकतेची दिशा लाभलेल्या करवीरनगरीत शिवरायांच्या नावाने विद्यापीठ स्थापन होण्याला वेगळे संदर्भ होते. प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकार दिवंगत बी. आर. खेडकर यांनी तयार केलेला महाराजांचा (चौथऱ्यासह) ३६ फूट ६ इंच उंचीचा आणि आठ टनांचा संपूर्ण ब्राँझमधील पुतळा या विद्यापीठाच्या प्रांगणात १ डिसेंबर १९७४ ला बसविला. छत्रपती शिवाजी महाराजांचे जगातील सर्वाधिक देखणे असे हे शिल्प आहे. विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्यांचे हे शिल्प प्रेरणास्त्रोत ठरले आहे. विद्यापीठाच्या प्रांगणात प्रवेश करतानाच महाराजांचे हे भव्य शिल्प अभ्यागताची नजर वेधून घेते. कुलगुरू, अन्य अधिकारी, प्रशासकीय सेवक हे मुख्य प्रशासकीय भवनाकडे येत असताना महाराजांना अभिवादन करून मगच कार्यालयात येतात. जुन्या पुणे-बंगळूर महामार्गावरून ये-जा करणारे नागरिक, बसमधील प्रवासी हा पुतळा दिसताच नमस्कार करतात. शालेय विद्यार्थी जाता-येता पुतळ्याचे दर्शन झाले की, 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' आणि 'जय भवानी, जय शिवाजी' अशा घोषणा देतात. विद्यापीठात शिवजयंतीचे वातावरण तर अधिकच भारावून टाकणारे असते. विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा हा कोल्हापुरातील सर्वाधिक छायाचित्रे काढले जाणारे ठिकाण आहे.

**पुतळ्याची मनोभावे स्वच्छता करणारे जनार्दन गवळी**

कुलगुरुपद स्वीकारण्यास येत असताना प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी आपल्यासोबत मनोहर पाटील नावाचा एक तरुण शिपाई म्हणून आणला होता. महागावकर बंगल्यात विद्यापीठ कार्यालय असतेवेळी तेथे एक मारुती मंदिर आहे. या मारुतीची पूजाअर्चा न चुकता पाटील करत असत. त्यांनाच पुढे शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची स्वच्छता करण्याचे काम दिले होते.

सेवानिवृत्त होईपर्यंत रोज आंघोळ झाल्याबरोबर न चुकत पुतळा धुणे, अष्टगंध, फुले वाहून महाराजांची पूजा, वंदन करूनच त्यांची पुढील दिनचर्या सुरू व्हायची. त्यांचा हा वारसा पुढे जनार्दन गवळी यांनी आजतागायत सांभाळला आहे. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे २२ वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी एकही दिवस सुटी न घेता काम केले, तर एकूण कारकिर्दीत अवघ्या २५ रजा घेतल्या. सेवाभावाची ही प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळाच आपल्याला देत असल्याचे गवळी सांगतात.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारुढ पुतळा

1 9 FEB 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवजयंती.. प्रभाती 'सूर्य' नभी रंगती..!



शिवजयंतीच्या पूर्वप्रभातीला (दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी) उगवतीच्या सूर्याने काही क्षणांसाठी आसमंत असे भगव्या रंगात रंगवून काढले. या लालिमेच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा असा उजळून निघाला. अभिमानाने छाती फुलून यावी, असेच हे दृश्य होते. **छाया : आलोक जत्राटकर**

19 FEB 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




**कोल्हापूर :** शिवजयंतीच्या पूर्वप्रभातीला बुधवारी (दि. १८) सकाळी उगवतीच्या सूर्याने अवघ्या काही क्षणांसाठी आसमंत असे भगव्या, नारंगी रंगांत न्हाऊन काढले. या लालिमेच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा.

19 FEB 2026
तरुण भारत



# इथे दररोज होतो शिवरायांचा जयघोष

- शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे दर्शन घेत घडले लाखो विद्यार्थी

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने कोल्हापुरात १८ नोव्हेंबर १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजतागायत अखंडपणे छत्रपती शिवाजी महाराजांना नित्यनेमाने अभिवादन करून त्यांच्या नावाचा मनोभावे जयघोष केला जात आहे. शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात बसवलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन घेवून आजपर्यंत लाखो विद्यार्थी देशपातळीवर घडले आहे.

छत्रपती राजाराम महाराज, प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्या प्रेरणेतून आणि स्व. यशवंतराव चव्हाण, लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रयत्नांतून कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले. प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकार स्व. बी. आर. खेडकर यांनी तयार केलेला महाराजांचा (चौथऱ्यासह) ३६ फूट ६ इंच उंचीचा आणि 'आठ टनांचा संपूर्ण ब्रॉंझमधील पुतळा या विद्यापीठाच्या प्रांगणात १ डिसेंबर १९७४ रोजी बसविला. छत्रपती शिवाजी महाराजांचे जगातील सर्वाधिक देखणे असे हे शिल्प आहे.


विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्यांचे हे शिल्प प्रेरणास्रोत ठरले आहे. विद्यापीठाच्या प्रांगणात प्रवेश करतानाच महाराजांचे हे भव्य शिल्प अभ्यागताची नजर वेधून घेते. महाराजांना अभिवादन केल्याखेरीज कोणीच आत प्रवेश करीत नाही. विद्यापीठातील अनेक शिक्षक, अधिकारी आणि प्रशासकीय सेवकही महाराजांना अभिवादन करून मगच कार्यालयात येतात. इतकेच काय, सकाळी आणि सायंकाळी विद्यापीठात फिरायला येणारे अभ्यागत सुद्धा दिवसातले पहिले अभिवादन महाराजांच्या या पुतळ्याला करून मगच पुढे मार्गस्थ होतात. याशिवाय, जुन्या पुणे–बेंगलोर महामार्गावरून ये–जा करणारे नागरिक, बसमधील प्रवासी हा पुतळा दिसताच नमस्कार करतात.

## पुतळ्याची मनोभावे स्वच्छता करणारे जनार्दन गवळी

प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी आपल्यासोबत मनोहर पाटील नावाचा एक तरुण शिपाई म्हणून आणला होता. त्याला शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची स्वच्छता करण्याचे काम दिले होते. ते अत्यंत निष्ठेने व भक्तिभावाने महाराजांच्या पुतळ्याची निगराणी करीत असत. त्यांचा हा वारसा पुढे जनार्दन गवळी यांनी आजतागायत सांभाळला आहे. निवृत्त झाल्यापासून पुतळ्याच्या स्वच्छतेचे काम आजही ते मोठ्या भक्तीभावाने करीत आहेत.

19 FEB 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवजयंतीच्या पूर्वप्रभातीला (दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी) उगवतीच्या सूर्याने अवघ्या काही क्षणांसाठी आसमंत असे भगव्या, नारंगी रंगात न्हाऊन काढले. या मनोहरी दृश्याच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारुढ पुतळा.

(छाया : डॉ. आलोक जत्राटकर, जनसंपर्क अधिकारी, शिवाजी विद्यापीठ )